# लॉयड्सच्या प्रकल्पांचे उद्घाटन

## नक्षलग्रस्त जिल्ह्याची ओळख पुसली जातेय: मुख्यमंत्री

गडचिरोली, ता. २२ : नुकत्याच संमत झालेल्या जनसुरक्षा विधेयकाला विरोधी पक्ष विशेषत: काँग्रेस कडवा विरोध करत आहे. कारण काँग्रेसचे नेते राहुल गांधी केवळ डावे नव्हे तर अतिडावेग्रस्त झाले आहेत. ते आदेश देतात आणि त्यानुसार त्यांच्या पक्षातील लोकं विधेयकाला विरोध करतात, अशी टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी (ता. २२) केली. आता नक्षलग्रस्त ही गडचिरोली जिल्ह्याची ओळख पुसली जात आहे. आता हातावर मोजण्याइतकेच सशस्त्र नक्षलवादी शिल्लक आहेत. त्यांनी हिंसाचाराचा मार्ग सोडून मुख्य प्रवाहात यावे, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मंगळवारी (ता. २२) गडचिरोली जिल्ह्यातील कोनसरी येथे लॉयड्स मेटल्स अँण्ड एनर्जी लिमिटेडच्या (एलएमईएल) विविध प्रकल्पांचे उद्घाटन आणि भूमिपूजन करण्यात आले. यात हेडरी येथील पाच दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमतेच्या आयर्न ओर ग्राइंडिंग प्लांट, हेडरी ते कोनसरी दरम्यानची ८५ किलोमीटर लांबीची आणि १० दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमतेची स्लरी पाइपलाइन, आणि कोनसरी येथील ४ दशलक्ष टन क्षमतेच्या पेलेट प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले.



**गडचिरोली :** लॉयड्स मेटल्सच्या विविध प्रकल्पांचे उद्घाटन व भूमिपूजन करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, बाजूला राज्यमंत्री अ‍ॅड. जयस्वाल, दुसऱ्या बाजूला व्यवस्थापकीय संचालक बी. प्रभाकरन, आमदार धर्मरावबाबा आत्राम व इतर.

### आता धोका शहरी नक्षलवादाचा!

बंदूकी धारण केलेला नक्षलवाद संपत असला तरी छुप्या पद्धतीने कार्यरत "शहरी नक्षलवादा"पासून धोका निर्माण झाला आहे. लॉयड्स मेटल्सच्या माध्यमातून खाण व पोलाद प्रकल्प उभारत गडचिरोलीचा विकास सुरू झाला असताना आदिवासींच्या जमिनी हिसकावल्या, मोठ्या प्रमाणात जंगलतोड, आदिवासींची कत्तल अशा अफवांच मोहीम काही महिन्यांपूर्वी चालवण्यात आली होती. पोलिसांनी जेव्हा सखोल तपास केला तेव्हा या अफवा पसरवणारे काही कलकत्त्यात सापडलेत, तर काही बंगळुरूमध्ये सापडले. त्यांना विदेशी निधीही मिळत होता. यावरूनच शहरी नक्षलवादाचा धोका असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.